Shri Sharda Bhavan Education Society's

# YESHWANT MAHAVIDYALAYA, NANDED-431602

## हिवाळी – २०२२ च्या परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याबाबत विद्यार्थ्यांना महत्वाची सुचना

दि.२८.०९.२०२२

शैक्षणीक वर्ष २०२२–२३ मध्ये B.A , B.COM , BSC प्रथम द्वितीय व तृतीय वर्ष वर्गात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, हिवाळी –२०२२ मध्ये होणा–या सत्रनिहाय परिक्षेकरिता परीक्षा आवेदनपत्र भरण्याच्या तारखा , तसेच उन्हाळी –२०२२ च्या परिक्षेत नापास झालेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षा आवेदनपत्र भरण्याच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत.

१.नियमित शूल्कासह दि.०८.१०.२०२२ पर्यंत

२. नियमित परिक्षा शूल्क रू. १००/– विलंब शूल्क यासह महाविद्यालयामध्ये अर्ज सादर करण्याची मुदत दि.०९.१०.२०२२ ते १३.१०.२०२२ पर्यत.

३.दि.१४.१०.२०२२ ते दि.२०.१०.२०२२ पर्यत नियमित, विलंब शुल्कासह प्रती दिवस रू. ५०/– अतिविलंब शुल्क आकारून परिक्षा आवेदनपत्र केवळ परिक्षा विभागातच स्विकारले जातील.

४.परिक्षा आवेदनपत्रासोबत प्रथम व द्वितीय वर्ष वर्गाच्या विद्यार्थ्यांनी मागील परिक्षेच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत परिक्षा आवेदनपत्रासोबत जोडावी. तसेच तृतीय वर्ष वर्गाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय वर्ष वर्गाच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत सोबत जोडणे अनिवार्य आहे.

५. विद्यार्थ्यांनी परिक्षा आवेदनपत्र भरतेवेळी स्वत:चा ईमेल आयडी व मोबाईल नंबर अचुक नोदंवावा त्यात कोणत्याही प्रकारची खाडाखोड नसावी याची संपुर्ण जबाबदारी विद्यार्थ्यांची राहिल. याची विद्यार्थ्यांनी दक्षता घ्यावी.

नोट:– CGPA PATTERN व त्या पूर्वीच्या सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या परिक्षेच्या तीन संधी संपलेल्या असल्यामुळे आता केवळ CBCS अभ्यासक्रमानुसारच परिक्षा होणार आहेत. त्यामुळे CBCS अभ्यासक्र लागु होण्यापूर्वीच्या सर्व अभ्याक्रमातील एक किंवा अधिक विषयात अनुर्त्तीण विद्यार्थ्यांनी सध्या चालू असलेल्या CBCS अभ्यासक्रमानुसार सर्व विषय घेवून (प्रथम,द्वितीय व तृतीय ) परिक्षा आवेदनपत्र भरणे अनिवार्य आहे.

प्राचार्य
PRINCIPAL
Yeshwant Mahavidyalaya
NANDED.

<u>नोट :</u>विद्यार्थांनी परीक्षा आवेदनपत्र वितरण विभाग (खिडकी कमांक ११) येथून घेवून कार्यालयातील पदवी प्रवेश विभाग B.A, B.COM , BSC खिडकी कमांक ५, ६ व ७ वर तपासून घेतल्यानंतर परीक्षा आवेदनपत्राचे शुल्क विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या आयडी नंबरवरून **Online Payment Gateway** पध्दतीने **https://fees.ymnnanded.in** या लिंक मार्फत या पोर्टलद्वारे ऑनलाईन भरुन शुल्क भरलेल्या पावतीची ०२प्रिंट व परीक्षा आवेदनपत्र गुणपत्रिकेच्या छायांकित प्रतीसह महाविद्यालयाच्या रोकड विभागामध्ये (खिडकी कमांक ८ व ९) सादर करणे अनिवार्य आहे. <u>आवेदनपत्र व पावती सादर न केल्यास होणाऱ्या परिणामास संबंधित सर्वस्वी विद्यार्थ्याची जबाबदारी राहील.</u>

# हिवाळी – २०२२ च्या वर्गनिहाय व सत्रनिहाय परीक्षा फीस खालीलप्रमाणे

| अ. क्र. | वर्ग | परिक्षा शूल्क | अंतर्गत गुणाची शूल्क | कौशल्य अभ्यास कम शूल्क फक्त द्वितीय व तृतीय वर्षाकरिता | पर्यावरण शास्त्र शूल्क ज्या विद्यार्थ्यां चा विषय (बॅक) राहिला असेल तर | एक सत्रात तीन पर्यंत पेपर राहिले असल्यास | परिक्षा फॉर्म शूल्क | **एकूण परिक्षा** शूल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **BA , BCOM , BSC I Year** | **350** | **100** | **------** | **------** | **285** | **5/-** | **455/-** |
| **1** | **BA , BCOM , BSC II Year** | **350** | **100** | **55** | **------** | **285** | **5/-** | **510/-** |
| **2** | **BA, BCOM , BSC III Year** | **350** | **100** | **55** | **165** | **285** | **5/-** | **675/-** |

प्राचार्य

PRINCIPAL
Yeshwant Mahavidyalaya
NANDED.

॥ सा विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

Phone: (02462) 215294 **EXAMINATION DEPARTMENT** Website: srtmun.ac.in
email : directorboee@srtmun.ac.in

संदर्भ : परीक्षा /२०२२-२३/ ११२९ दिनांक : २६/०९/२०२२

## महत्वाचे परिपत्रक

**हिवाळी-२०२२ परीक्षेकरीता पदवी परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याबाबत**
**विद्यार्थी व महाविद्यालयांना मार्गदर्शक सूचना.**

सर्व संलग्नीत महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान, पदवी अव्यावसायीक सर्व अभ्यासक्रम, मॉडेल कॉलेज, हिंगोली, उपकेंद्र लातूर, उपकेंद्र परभणी, कै. श्री. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट व प्रस्तूत विद्यापीठ संकुल यांना कळविण्यांत येते की, **हिवाळी-२०२२ च्या परीक्षा हया लेखी पध्दतीने (Pen & Paper) दीर्घोत्तरी प्रश्नपत्रिकेद्वारे घेण्यांत येणार आहेत.** प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०२२ च्या परीक्षेसाठी परीक्षा आवेदनपत्र भरण्याची सूचना खालील प्रमाणे आहे.

CGPA PATTERN व त्यापूर्वीच्या सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना देण्यांत आलेल्या परीक्षेच्या ३ संधी संपलेल्या असल्यामुळे आता केवळ CBCS अभ्यासक्रमानुसारच परीक्षा होणार आहेत. त्यामुळे CBCS अभ्यासक्रम लागू होण्यापुर्वीच्या सर्व अभ्यासक्रमातील एक किंवा अधिक विषयात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी सध्या चालू असलेल्या CBCS अभ्यासक्रमानुसार सर्व विषय घेवून (प्रथम/द्वितीय/तृतीय वर्षाचे) परीक्षा आवेदनपत्र भरणे अनिवार्य आहे.

०१. विद्यार्थ्यांनी संबंधीत महाविद्यालयात परीक्षा आवेदनपत्र सादर करावयाची तारीख ;

अ. नियमित शुल्कासह **दिनांक ०८/१०/२०२२ पर्यंत.**

ब. नियमित परीक्षा शुल्क व रू.१००/- विलंब शुल्क यासह महाविद्यालयामध्ये अर्ज सादर करण्याची मुदत **दिनांक ०९/१०/२०२२ ते दिनांक १३/१०/२०२२ पर्यंत.**

क. **दिनांक १४/१०/२०२२ ते २०/१०/२०२२** पर्यंत नियमित, विलंब शुल्कासह प्रती दिवस रू. ५०/- अतिविलंब शुल्क आकारून परीक्षा आवदेनपत्र केवळ परीक्षा विभागातच स्विकारले जातील, असे परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयाने स्विकारू नयेत. दिनांक **२०/१०/२०२२ या तारखेनंतर विद्यार्थ्यांचे अतिविलंब शुल्काचे परीक्षा आवेदनपत्र परीक्षा विभागात पाठवू नयेत.**

ड. अतिविलंब शुल्कासह परीक्षा आवेदनपत्र परीक्षा विभागात पाठवितांना अशा विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयामध्ये सुध्दा ठेवावी, त्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण व इतर गुण विहित वेळेत परीक्षा विभागाकडे पाठविण्यांस मदत होईल.

०२. महाविद्यालयांनी सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काचा धनाकर्ष/NEFT/RTGS अभ्यासक्रम निहाय जसे की BA, B.Com, B.Sc असे विद्याशाखानिहाय **स्वतंत्रपणे मा.वित्त व लेखा अधिकारी,** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या नावे काढावा. तो धनाकर्ष/NEFT/RTGS **दिनांक १७/१०/२०२२** किंवा त्या पुर्वीच्या तारखेचा असणे आवश्यक आहे. अथवा खालीलप्रमाणे IDBI बँकेच्या खात्यामध्ये अभ्यासक्रमनिहाय/विद्याशाखानिहाय NEFT/RTGS द्वारे **दिनांक १७/१०/२०२२ पर्यंत** भरणा करावा. धनाकर्ष किंवा NEFT/RTGS विहीत तारखे नंतर काढल्यास १० दिवसा पर्यंत प्रतिविद्याशाखा प्रतीदिन रू. ५००/- तर १० दिवसानंतर प्रतिविद्याशाखा प्रतीदिन रू. १०००/- विलंब शुल्क आकारण्यात येईल.

धनाकर्ष/NEFT/RTGS **द्वारे परीक्षा शुल्क भरताना अभ्यासक्रमनिहाय भरावे; अन्यथा परीक्षा आवेदन पत्र स्वीकारले जाणार नाहीत. तसेच परीक्षा शुल्काचा धनाकर्ष/NEFT/RTGS कोणत्याही परिस्थतीत अतिरिक्त काढू नये, तसे केल्यास अतिरिक्त असलेली रक्कम इतरत्र वर्ग केली जाणार नाही.**

**Bank details for NEFT/RTGS/Online Payment :**

| | |
|---|---|
| **Name of the A/C holder** | **: Finance & Accounts Officer, S.R.T.M. University, Nanded.** |
| **Name of Bank** | **: IDBI Bank, Nanded.** |
| **IFSC Code** | **: IBKL0000500 A/C Number 500104000028422** |

०३. वरीलप्रमाणे सर्व अभ्याक्रमांचे **परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन** स्विकारण्यात येतील त्यासाठी **दिनांक ०६/१०/२०२२ ते १३/१०/२०२२** या दरम्यान ऑनलाईन लिंक चालू राहील. परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन भरल्यानंतर त्याची प्रिंटआउट काढून **दोन प्रति मध्ये** परीक्षा आवेदनपत्रासोबत सादर करावी.

महाविद्यालयांनी परीक्षा आवेदनपत्र व विहीत शुल्काचा धनाकर्ष विद्यापीठात सादर करण्याचे वेळा पत्रक खालील प्रमाणे राहील. विहीत तारखेस परीक्षा आवेदनपत्र सादर न केल्यास महाविद्यालयास प्रती विद्यार्थी प्रतीदिन रू. २/- किंवा रू. १०००/- या पैकी जे जास्त असेल तो विलंब शुल्क आकारण्यात येईल.

| अ. क्र. | जिल्हा | महाविद्यालय क्रमांक | तारीख | आवेदनपत्र सादर करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | नांदेड | १०१ ते १२१ | १९/१०/२०२२ | **प्रस्तूत विद्यापीठ** |
| ०२ | नांदेड | १२२ ते उर्वरीत सर्व | २०/१०/२०२२ | **प्रस्तूत विद्यापीठ** |
| ०३ | परभणी | २०१ ते २२१ | १९/१०/२०२२ | **उपकेंद्र परभणी** |
| ०४ | परभणी | २२२ ते उर्वरीत सर्व | २०/१०/२०२२ | **उपकेंद्र परभणी** |
| ०५ | हिंगोली | २०१ ते २२१ | १९/१०/२०२२ | **न्यू मॉडेल कॉलेज,हिंगोली** |
| ०६ | हिंगोली | २२२ ते उर्वरीत सर्व | २०/१०/२०२२ | **न्यू मॉडेल कॉलेज,हिंगोली** |
| ०७ | लातूर | ३०१ ते ३२१, | १९/१०/२०२२ | **उपकेंद्र लातूर** |
| ०८ | लातूर | ३२२ ते उर्वरीत सर्व | २०/१०/२०२२ | **उपकेंद्र लातूर** |
| ०९ | उपकेंद्रात स्वीकारलेले परीक्षा आवेदनपत्र विद्यापीठात जमा करणे | | २२/१०/२०२२ | |

०४. परीक्षा आवेदनपत्राचे शुल्क रू. ०५/- अतिरिक्त आकारण्यांत यावे.

०५. वरील आवेदनपत्रे महाविद्यालयांनी केवळ खास दुतामार्फतच पाठवावीत **पोष्टाने किंवा अन्य मार्गाने पाठवलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.**

०६. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षासाठी स्वतंत्र परीक्षा आवेदन पत्र भरण्यात यावे. तसेच नियमित व अनियमित (बॅकलॉक) विद्यार्थ्यांचे स्वतंत्र गठ्ठे बांधण्यात यावेत.

०७. परीक्षा आवेदनपत्र सादर करतांना प्रथम नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र त्यानंतर अनियमित (बॅकलॉक) विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र या प्रमाणे वर्गनिहाय सादर करावेत.

०८. **परीक्षा आवेदनपत्र सादर करतांना महाविद्यालयाने अभ्यासक्रम निहाय विषय शिकविणाऱ्या प्राध्यापकांची यादी (विहित नमुन्यात) व संबंधित प्राध्यापकांना विद्यापीठाने मान्यता दिलेल्या पत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.**

०९. **परीक्षा आवेदन पत्र अग्रेषीत करताना संबंधीत विषयास संलग्नीकरण चालू आहे काय, याची खात्री करावी तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता महाविद्यालयाने संलग्नीकरण शुल्क भरलेले असल्याबाबत खात्री करून घेवूनच परीक्षा आवेदनपत्र सादर करावीत. तसेच मा. संचालक क्रीडा विभाग, मा.संचालक, रासेयो तसेच संलग्नीकरण विभागाकडून महाविद्यालयांनी आवश्यक ते शूल्क भरलेले आहे याचे नाहरकत प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्या महाविद्यालयाचे परीक्षा आवेदनपत्र स्वीकारली जाणार नाहीत, याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील. उशीराने वरील प्रमाणे नाहकत प्रमाणपत्र सादर केल्यास नियमाप्रमाणे परीक्षा आवेदनपत्र स्वीकारतांना विलंब शूल्क आकारले जाईल. कृपया याची नोंद घ्यावी.**

१०. जुन्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र भरतांना चालु शैक्षणिक वर्षातील अभ्यासक्रमानुसार **समकक्षता दिलेली असल्यास** त्यानुसार तपासणी करून परीक्षा आवेदनपत्र भरण्यांत यावेत. अभ्यासक्रमनिहाय समकक्ष विषयांची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर देण्यांत आलेली आहे.

११. हिवाळी -२०२२ च्या परीक्षेसाठी **सुधारीत परीक्षा शुल्काप्रमाणे परीक्षा शुल्क घेण्यांत यावे.**

१२. **तसेच पदवी अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाकरीता परीक्षा आवेदनपत्र सादर करताना प्रथम वर्षाच्या उत्तीर्ण गुणपत्रिकेची प्रत जोडणे आवश्यक आहे.**

१३. BA & BSc (Theory + MCQ) – III & IV Sem अभ्यासक्रमासाठी परीक्षेच्या तीन संधी संपल्यामुळे या अभ्यासक्रमातील अनुत्तीर्ण असलेल्या विषयाची परीक्षा सध्या चालू असलेल्या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे पुर्ण विषय घेवून द्यावी लागेल.

तरी वरील सूचनांची नोंद घेवून ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :-**

१. मा.संचालक, लातूर व परभणी उपकेंद्र.
२. मा.प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.
३. मा. वित व लेखाअधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
४. मा.संचालक, श्री उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट.

**प्रत माहितीस्तव :-**

१. मा. कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्र.कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
३. सर्व विभाग प्रमुख, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.